# ३६. सर्वांगसूज आणि अतिकृशपणा या दोन प्रकारांतील फरक

(लहान मुलांचे आजार)

| सर्वांगसूजेचे कुपोषण | अतिकृशपणाचे कुपोषण (रोडावणे) |
|---|---|
| १. अपुऱ्या अन्नामुळे अधिकाधिक प्रथिने इंधनासाठी वापरली जातात व प्रथिनांच्या कमतरतेमुळे अंगावर सूज येते. मुलाच्या चेहऱ्यावर व शरीरावर सूज असते, केस पिंगट होऊन सहज गळतात, डोळे निस्तेज असतात. | १. अन्नाच्या अभावी मु‘यत पिष्ट पदार्थ व चरबी ही इंधनासाठी वापरली जाते व त्यामुळे कातडी सुरुकुतते, हात–पाय बारीक होतात. चेहरा सुरकुतलेला, मूल अगदी बारीक दिसते. |
| २. आजूबाजूच्या गोष्टींमध्ये, खेळण्यामध्ये मुलाला रस वाटत नाही. | २. मुलांमध्ये तरतरी असते, आजूबाजूच्या गोष्टींमध्ये मन रमू शकते, सतत किरकिर रडणे. |
| ३. भूक पूर्ण मंदावलेली असते. | ३. सतत भूक लागते व मूल खाण्यास मागते. |
| ४. त्वचेचा रंग बदलतो, त्वचेची सालटी जातात व कातडीचे जंतुदोष उद्भवतात. | ४. त्वचेचा रंग फारसा बदलत नाही. |
| ५. हातापायाचा वरचा भाग अगदी बारीक, स्नायू बारीक पण हातापायाच्या खालच्या भागांवर सूज चढलेली, पोट फुगलेले दिसते. | ५. हात, पाय अगदी कृश, पोटाचा नगारा, छातीचा पिंजरा स्पष्ट दिसतो. |
| ६. हाडाच्या सापळ्यावर कातडी व त्याखाली पाणी साचलेले असल्याने सूज दिसते. | |